# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक-एडीव्ही ३११६/सीआर-६९/२०१९/तीन दिनांक:-१५ सप्टेंबर, २०२०

**-:प्रसिध्दीपत्रक:-**

**विषय:- महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २०२०—**
**उमेदवारांना केंद्र निवडण्याची मुभा देण्याबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १८ मार्च, २०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन पूर्व नियोजित वेळापत्रकानुसार महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २०२० चे आयोजन रविवार, दिनांक १७ मे, २०२० रोजी नियोजित होते. तथापि, कोरोना (COVID-१९) विषाणूचा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरीता सुरु असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना व लॉकडाऊनचा कालावधी लक्षात घेवून दिनांक १७ जून, २०२० व दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार सदर परीक्षा **रविवार, दिनांक १ नोव्हेंबर, २०२०** रोजी घेण्याचे प्रस्तावित आहे.

**२.** जाहिरातीस अनुसरुन परीक्षा आयोजनाच्या पूर्व नियोजित दिनांकास अनुसरुन पदवीच्या अंतिम वर्षात शिकत असलेल्या तसेच, पुणे येथे स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासासाठी वास्तव्य करणा-या उमेदवारांनी त्यावेळच्या स्थितीनुसार जिल्हा केंद्राची निवड केली असल्याची शक्यता आहे. तदनंतर कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे व लॉकडाऊनमुळे बदललेल्या पार्श्वभूमीवर सदर उमेदवार त्यांच्या मूळ गावी गेले आहेत. ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यामध्ये विद्यापीठांकडून अंतिम वर्षांच्या उमेदवारांच्या परीक्षांचे ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने केले जाणारे आयोजन व राज्याच्या ग्रामीण भागातील कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव यामुळे उमेदवारांच्या वास्तव्यामध्ये परत बदल होण्याची शक्यता असल्याने आयोगामार्फत दिनांक १ नोव्हेंबर, २०२० रोजी आयोजित विषयांकित परीक्षेकरीता अर्ज सादर केलेल्या **सर्व** उमेदवारांना मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर यापैकी त्यांच्या पसंतीचे केंद्र निवडण्याची मुभा देण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे.

**३.** आयोगाच्या वरील निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल:-

(१) जाहिरातीस अनुसरुन अर्ज करताना उमेदवाराने निवडलेले केंद्र रदद करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईलदवारे **दिनांक १७ सप्टेंबर, २०२० रोजी दुपारी १४.०० ते दिनांक २२ सप्टेंबर, २०२० रोजी २३.५९** वाजेपर्यंत उमेदवारांना त्यांच्या पसंतीचे केंद्र निवडण्याची संधी पुन्हा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(३) संबंधित केंद्रांच्या ठिकाणी शाळा / महाविद्यालयाच्या स्थानिक पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेनुसार प्रत्येक केंद्रावर उमेदवारांना प्रवेश द्यावयाची कमाल क्षमता निश्चित करण्यात येत आहे. सदर क्षमता लक्षात घेऊन "प्रथम येणा-यास प्राधान्य" (First Apply-First Allot) या तत्वानुसार केंद्र निवडण्याची मुभा असेल संबंधित केंद्राची कमाल क्षमता संपुष्टात आल्यानंतर त्या केंद्राची निवड उमेदवारांना करता येणार नाही.

(४) विहित कालावधीत केंद्राची निवड न करणा-या उमेदवारांना प्रस्तुत परीक्षेच्या त्यांच्या अर्जामधील कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्यानुसार (Permanent Address) मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर या केंद्रांपैकी त्यांच्या महसुली विभाग़ाच्या मुख्यालयाच्या केंद्रावर व उर्वरित उमेदवारांना त्यांच्या कायमस्वरुपी निवासाच्या पत्त्याच्या आधारे नजीकच्या महसुली विभाग़ाच्या मुख्यालयाच्या केंद्रावर प्रवेश देण्यात येईल.

(५) एखादया केंद्राची क्षमता संपुष्टात आल्यानंतर केंद्राची निवड न करणा-या अथवा निवड करु न शकलेल्या उमेदवाराला आयोगाकडून उपलब्ध करुन देण्यात येणा-या केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

(६) नव्याने केंद्र निवडण्याकरीता सर्व उमेदवारांना त्यांच्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल दूरध्वनी क्रमांकावर लघुसंदेशादवारे (एसएमएस) कळविण्यात येईल.

**४.** वरील व्यवस्थेप्रमाणे निवडण्यात आलेले केंद्र बदलण्याची विनंती यापुढे कोणत्याही कारणास्तव, कोणत्याही सबबीखाली मान्य करता येणार नाही.

सह सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग